**नियमित फौजदारी खटला क्र.९/२०२३**
**सरकार वि. अमोल विकास आवटे + २**
निशाणी क्र. १७
CNR No. MHAM120003352023

## <u>दोषारोप</u>

मी समीर दि. कमलाकर, प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, दर्यापूर

आरोपींची नावे:- १. अमोल विकास आवटे,
वय – ३७ वर्ष, धंदा - मजूरी,

२. शिवरामकृष्ण उर्फ पंकज रामदास आवटे,
वय – ४० वर्ष, धंदा - मजूरी,

३. विकास गोविंदराव आवटे,
वय – ६४ वर्ष, धंदा - मजूरी,
सर्व रा. वरूड कुलट, ता.दर्यापूर,
जि. अमरावती.

यांच्यावर खालीलप्रमाणे दोषारोप निश्चित करीत आहे.

दिनांक ०१.१२.२०२२ रोजी सायंकाळी ०७.३० वाजेच्या सुमारास मौजा वरूड कुलट, ता. दर्यापूर, जि. अमरावती येथील चौकामध्ये तुम्ही तुमच्या समान उद्देशाने लाकडी टेम्पे ज्याचा हत्यार म्हणून वापर करण्यात आला व ज्याने मृत्यू होण्याचा संभव आहे अशा हत्याराने फिर्यादीच्या डोक्यावर मारहाण करुन जखमी करुन इच्छापूर्वक दुखापत पोहोचविली व त्याद्वारे तुम्ही भारतीय दंड विधानाच्या कलम **३२४ सह कलम ३४** अन्वये गुन्हा केला आहे, जो या न्यायालयाच्या दखलेत येतो.

याच दिवशी, वेळी व ठिकाणी तुम्ही तुमच्या समान उद्देशाने फिर्यादीला थापडाबुक्क्यांनी मारून त्याला इच्छापूर्वक दुखापत पोहोचविली व त्याद्वारे तुम्ही भारतीय दंड विधानाच्या कलम **३२३ सह कलम ३४** अन्वये गुन्हा केला आहे, जो या न्यायालयाच्या दखलेत येतो.

याच दिवशी वेळी व ठिकाणी तुम्ही तुमच्या समान उद्देशाने फिर्यादीला शिवीगाळ करुन अपमानीत केले व त्याद्वारे त्याला सार्वजनिक शांततेचा भंग करण्यास प्रवृत्त केले

व त्याद्वारे तुम्ही भारतीय दंड विधानाच्या कलम **५०४ सह कलम ३४** अन्वये गुन्हा केला आहे, जो या न्यायालयाच्या दखलेत येतो.

याच दिवशी वेळी व ठिकाणी तुम्ही तुमच्या समान उद्देशाने फिर्यादीला शिविगाळ करुन पाहून घेण्याच्या धमक्या देवून धाकटपटशा केला व त्याद्वारे तुम्ही भारतीय दंड विधानाच्या कलम **५०६ सह कलम ३४** अन्वये गुन्हा केला आहे जो या न्यायालयाच्या दखलेत येतो.

आणि मी याद्वारे तुमच्याविरुध्द वरील गुन्ह्याकरीता खटला चालवण्याचे निर्देश देतो.

SAMEER DILIP KAMALAKAR
Digitally signed by SAMEER DILIP KAMALAKAR
Date: 2026.03.12 17:48:58 +0530

(स. दि. कमलाकर)

दिनांक १२.०३.२०२६ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, दर्यापूर.

**<u>प्रमाणपत्र</u>**

प्रमाणित करण्यात येते की, आरोपींना उपरोक्त दोषारोप त्यांच्या भाषेत वाचून व समजावून सांगितला.

SAMEER DILIP KAMALAKAR
Digitally signed by SAMEER DILIP KAMALAKAR
Date: 2026.03.12 17:49:02 +0530

(स. दि. कमलाकर)

दिनांक १२.०३.२०२६ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, दर्यापूर.